महाराष्ट्र टाइम्स

# भारतीय किरकोळ विक्रेत्यांसाठी एक नवी पहाट

## पारंपारिक वितरण प्रणाली आणि ई-रिटेलर्सकडून होणाऱ्या स्पर्धांना कंटाळल्याने, पारंपरिक किरकोळ विक्रेत्यांना 'जस्ट बाय'मार्फत मिळाला नवीन मोबाईल ॲपच्या मदतीचा हात

हा एक शांतीपूर्ण असा लढा असल्याने, कुठेही ठळक बातम्या किंवा मतांची मांडणी नाही. भारतीय किरकोळ विक्रेत्यांची दुकानं आज आधुनिक ई-रिटेलर आणि पारंपरिक वितरण प्रणालीच्या कात्रीत सापडली आहेत. त्यांना मुक्त आणि स्वच्छ पद्धतीने व्यापार करण्याचा हक्क मिळत नसल्याने १.५- कोटी भारतीय किरकोळ विक्रेत्यांचे भविष्य आज अंधारमय झाल्याचे दिसत आहे.

पण एक आशेचा किरण आता दिसू लागला आहे. 'जस्ट बाय लाइव्ह', जगातील पहिले ई-वितरक, ज्यांनी बनविलेल्या मोबाईल ॲप्लिकेशनमुळे पारंपरिक क्रिरकोळ विक्रेत्यांना समसमान पद्धतीने व्यापार करता येऊ शकेल. या ॲपवर १००० पेक्षा जास्त ब्रँड असून उत्पादनांची संख्या ही सुमारे ३ लाख एवढी आहे, ज्यांची मागणी किरकोळ विक्रेतेही थेट ब्रँड आणि उपादकांकडून करू शकतात. 'जस्ट बाय लाइव्ह'द्वारे किरकोळ विक्रेत्यांना आपला माल अगदी घरी बसूनदेखील मागविता येऊ शकतो.

दयाल स्टोअर्सचे मालक भावेश ठक्कर म्हणतात, " बऱ्याचदा वितरक आमच्याशी स्पष्टपणे संपर्क साधत नसल्याने कंपनीद्वारे दिल्या जाणाऱ्या योजना आणि ऑफर्स या आम्हाला नीट समजत नाही, ज्याचा




भावेश ठक्कर, दयाल स्टोअर्स

### सामान्य दुकानदार

थेट परिणाम हा आमच्या नफ्यातील अंतरावर (मार्जिन) होतो. पण ॲपवर, सगळ्या ऑफर्स या पारदर्शक पद्धतीने दिल्या जातात. ॲपमुळे आम्हाला अशा कंपन्यांशीदेखील संपर्क साधता येतो, ज्यांचे वितरण अजून आमच्यापर्यंत पोहोचलेले नाही किंवा ज्यांची उत्पादने आम्हाला माहिती नाही. याचाच अर्थ असा की एखाद्या विशिष्ट ब्रँडची किंवा उत्पादनाची ग्राहकाने मागणी आमच्याकडे केली तर 'साठा नाही' असे सांगून आम्हाला त्याला परत पाठवायची आवश्यकता नाही."

मोफत असलेले 'जस्ट बाय ॲप' हे सध्या २५,००० किरकोळ विक्रेत्यांद्वारे वापरले जात आहे. हे ॲन्ड्रॉइड आणि ॲपल ॲप स्टोअर्सवर उपलब्ध आहे.

**'लाइक अँड शेअर'** या पानावरील सदरांसाठी तुमचा लेख **२५० शब्दांत** मराठीत (युनिकोडमध्ये) टाइप करून जरुर शेअर करा **mtlikeshare@gmail.com** या इमेल आयडीवर. इमेल सब्जेक्टमध्ये त्या त्या सदरांचे नाव उल्लेख करण्यास विसरू नका. **फॅक्स: २२७३११७५**